दै. देशोन्नती दि. 21/03/2024

लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागल्यानंतर नांदेड जिल्ह्यात तपास यंत्रणांची पहिली कारवाई

४४ लाखांची रोकड, ७ लाखांचे मद्य, १६ लाखांचे साहित्य जप्त

शोन्नती वृत्तसंकलन...

नांदेड ■ आचारसंहिता लागल्यानंतर ल्ह्यात कडेकोट तपासणी सुरू करण्याचे निर्देश ल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले हेत. दररोज या संदर्भात पाठपुरावा करण्यात ा असून या यंत्रणांनी कोणाचीही हयगय न रता जप्ती प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश त्यांनी ले आहेत. जिल्ह्यात सायंकाळपर्यंत ४४ खाची रोकड, ७ लाखाचे मद्य व १६ लाखांचे य साहित्य जप्त करण्यात आले आहेत.

निवडणूक कालावधीत जिल्ह्यात कायदा व वस्था अबाधित राहण्यासाठी आज ल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे ल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या क्षतेखाली आढावा बैठक पार पडली. ीस, अंमलबजावणी संचालनालय, इनकम

ईडी, आयटी, आरटीओ, उत्पादन शुल्क, वन व अन्य विभागांकडून जप्ती सुरू



टॅक्स, परिवहन, वनविभाग, राज्य उत्पादन शुल्क, प्राप्तीकर, महसुल, अंमली पदार्थ नियंत्रण दल, सिमा सुरक्षा बल, डाक विभाग, नागरी उडयन विभाग आदी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यामध्ये ४४ लाखांची रोकड, ७ लाखांचे मद्य, १६ लाखांचे अन्य साहित्य आतापर्यंत जप्त करण्यात आले, या संदर्भात बैठकीत चर्चा झाली. जिल्ह्यात येणाऱ्या- जाणाऱ्या सर्व सीमांवर ज्यांचे ज्यांचे तपासणी कक्ष आहेत त्या ठिकाणी काटेकोरपणे कारवाई करण्यात यावी, तपासणी दरम्यान ज्या यंत्रणेचे घटनास्थळावर पोहोचणे आवश्यक असेल त्यांनी तातडीने त्याठिकाणी पोहचावे यासंदर्भात नियुक्त फ्लाईंग स्क्वॉडला माहिती द्यावी, कोणत्याही परिस्थितीत जिल्ह्यामध्ये अवैध वाहतूक दारूची तस्करी आणि बेनामी रोकडचे वहन होणार नाही, यासाठी सर्व यंत्रणांनी डोळ्यात तेल घालून काम करावे, असे सक्त निर्देश यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा कोषागार अधिकारी ज्योती बगाटे, मनपाचे मुख्य लेखाधिकारी डॉ. जनार्दन पक्वाने, आयटीचे संतोष निलेवार यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या कालावधीसाठी 'इलेकशन सिझर मॅनेजमेंट सिस्टीम ॲपची निर्मिती आयोगाने केली आहे. निवडणूक काळात कुठलेही गैरप्रकार घडू नयेत म्हणून यात सर्व सहभागी शासकीय यंत्रणा, पथके बारकाईने लक्ष ठेऊन कारवाई करतात. रोकड, अवैध मद्यसाठा, अंमली पदार्थ वा शस्त्र अशी कुठलीही जप्तीची कारवाई केल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना ती माहिती त्वरित या ॲपमध्ये समाविष्ट करावी लागणार आहे. त्यामुळे या कारवाईची माहिती लगेचच निवडणूक आयोगाला मिळणार आहे. तथापी, या यंत्रणेचा आणखी सक्रिय वापर करण्याचे निर्देश आज जिल्हाधिकाऱ्यांनी या बैठकीत दिले.